ISSN 2349-638x
Impact Factor 5.707

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 46

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor

Dr. T. L. Barbole
Head, Dept. of Economics

Dr. B. W. Gund
Head, Dept. of Pol. Science

Prof. N. B. Kale
Head, Dept. of Commerce

Prof. B. J. Kukade
Head, Dept. of Sociology

Chief Editor
Prof. Pramod Tandale

| Sr.No. | Author Name | Title of Article / Research Paper | Page No. |
|---|---|---|---|
| **COMMERCE** | | | |
| 34. | प्रा. आशपाक शमशोद्दीन आतार | जागतिकीकरणानंतर वाणिज्याचे बदलते प्रभाव | 98 |
| 35. | प्रा.डॉ.शिवांगी संजयराव दहिटणकर | जागतीकीकरण आणि भारतीय शेती व्यवसाय | 101 |
| 36. | प्रा.डॉ. बालाजी शिवाजी राजोळ | जागतिकरणाचे भारतीय उद्योगावरील परिणाम | 103 |
| 37. | प्रा. डॉ. साळुंके डी. जी.<br>श्री. प्रा. मुळे पी. के | भारताच्या परकीय धोरणावर जागतिकीकरणाचा प्रभाव | 106 |
| **ECONOMICS** | | | |
| 38. | प्रा. डॉ.अनंत नरवडे | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था | 110 |
| 39. | डॉ.नरसिंग भानुदास देशमुख | जागतीक पातळीवर भारतीय वस्त्रोद्योगाची सद्यस्थिती | 114 |
| 40. | डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर<br>प्रा. प्रमोद केशवराव मुळे | जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 116 |
| 41. | श्रीमंत तुकाराम कावळे<br>प्रा. डॉ. बी.ए. पाटील | भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची भुमिका | 119 |
| 42. | प्रा. भैरवनाथ बब्रुवान मोटे | भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिकरणाचे परिणाम | 124 |
| 43. | श्री दत्ता बलभिमराव पवार<br>डॉ. टी. एल. बारबोले | जागतिकीकरणानंतर कृषीक्षेत्र | 127 |
| 44. | जगदीश अनंतराव करंडे | जागतिकीकरणानंतर कृषी क्षेत्र : एक चिंतन | 129 |
| 45. | डॉ. प्रकाश मांगीलाल राठोड | जागतिकीकरणाच्या महाप्रलयात भरकटल्या जाणाऱ्या नौकर वर्गाची व्यथा | 134 |
| 46. | श्रीमती मीनाक्षी प्रल्हादराव शिंदे | जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम | 136 |
| 47. | डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर<br>डॉ. तुकाराम लिंबाजी बारबोले | जागतिकीकरणापूर्वीचे व जागतिकीकरणानंतरचे भारतीय अर्थव्यवस्थेचे विविध विकास दर | 141 |
| 48. | प्रा. डॉ. शेळके | जागतिकीकरणानंतर औदयोगिक क्षेत्र. | 144 |
| 49. | प्रा. डॉ. अनिल दि. वाडकर | जागतिकीकरणानंतरची भारतीय अर्थव्यवस्था:एक आर्थिक अभ्यास | 146 |
| 50. | प्रा.डॉ. ए.बी. माळशिखरे | जागतिकीकरणाची भारतीय कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने | 149 |
| 51. | प्रा.डॉ. बी के बांगर | जागतिकीकरण आणि सध्याची भारतीय अर्थव्यवस्था | 151 |
| 52. | डॉ. कार्तिक पोळ | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर झालेला परिणाम | 153 |

# जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम



**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
सहयोगी प्राध्यापक व
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रा. प्रमोद केशवराव मुळे**
सहयोगी प्राध्यापक व
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर

**प्रस्तावना :-**

1991 मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारले यात खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण याचा समावेश होतो. हे सर्व घटक एकमेकावर आधारित आहेत. सर्वसाधारणपणे जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे. सर्वसाधारणपणे जागतिकीकरण म्हणजे विविधता असलेल्या अर्थव्यवस्थेचा समूह होय. परस्परातील व्यवहारातून आणि वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रक्रियेतून कालांतराने एक वैशिष्ट्यपूर्ण अर्थव्यवस्था अस्तित्वात येते त्यास जागतिकीकरण असे म्हणतात. जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेबरोबर एकीकरण करणे. 20 च्या शतकाच्या शब्दकोषानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे. एकावेळी संपूर्ण जगाचा किंवा जगातील सर्व लोकांचा विचार करणे. जागतिकीकरणात सर्वात महत्त्वाचे क्षेत्र 'परकीय क्षेत्र' असते. जगातील कोणत्याही कोपऱ्यापर्यंत वस्तू आणि सेवा पुरविणे संपूर्ण जग हीच बाजारपेठ असणे.

जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम हा शोध निबंध लिहिताना पुढील गृहीतके गृहीत धरली आहेत.

**गृहीतके :-**

1) जागतिकीकरणामुळे भारताच्या परकीय गंगाजळीत वाढ होत आहे.
2) जागतिकीकरणामुळे भारताला नवीन तंत्रज्ञान प्राप्त होत आहे.
3) जागतिकीकरणामुळे भारताच्या आर्थिक वृध्दीच्या दरात वाढ होत आहे.

**संशोधन पध्दती व संशोधन साधने :-**

विश्लेषणात्मक संशोधन पध्दती वापरलेली आहे व द्वितीयक साधन सामग्रीचा वापर केला आहे. संदर्भ ग्रंथ, पुस्तके, भारत सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण अहवाल याचा वापर लिखाणासाठी केला आहे.

जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर पुढील परिणाम झाले.

**जागतिकीकरणाचे परिणाम :-**

**1) परकीय गंगाजळीची प्राप्ती :-** जागतिकीकरणामुळे भारताला परकीय गंगाजळीची प्राप्ती झालेली आहे. सन 1991 मध्ये भारताजवळ दोन आठवडे पुरेल एवढी म्हणजे एक अब्ज डॉलर परकीय गंगाजळी होती. नवीन आर्थिक सुधारणेमुळे राष्ट्राच्या परकीय गंगाजळीत वाढ झालेली आहे. 27 मार्च 2015 च्या आकडेवारीनुसार भारतातील परकीय गंगाजळीचा साठा पुढील प्रमाणे होता.

**तक्ता क्रमांक-1**
**27 मार्च 2015**
**भारतीय अर्थव्यवस्थेत परकीय चलनसाठा (बिलीयन डॉलर)**

| घटक | चलनसाठा |
|---|---|
| परकीय चलन संपत्ती | 316.2 |
| सोने (558 टन) | 19.8 |
| एसडीआर | 1.3 |
| आरटीआर | 4.0 |

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, जागतिकीकरणानंतर भारताच्या परकीय चलनसाठ्यात भरीव वाढ झालेली आहे. परकीय चलनसाठ्यातील वाढीच्या अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, परकीय चलनसाठा जास्त असेल तर अर्थव्यवस्था सक्षम असते. परकीय चलनसाठा विचारात घेतल्यास भारत सध्या जगात चौथ्या क्रमांकावर आहे. देशाच्या परकीय चलनात रिझर्व्ह बँकेकडील परकीय चलन मालमत्ता, रिझर्व्ह बँकेकडील सोन्याचा साठा, विशेष आहरण अधिकार (एसडीआर) व आय.एम.एफ.कडील आरक्षित निधी म्हणजे आर.टी.पी.चा समावेश होतो.

**2) भारताच्या स्थूल देशी उत्पन्नात वाढ झाली आहे.** जागतिकीकरणानंतर भारताच्या स्थूल देशी उत्पन्नात, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे.

**तक्ता क्रमांक-2**
**भारताचे दरडोई उत्पन्न (स्थिर किंमतीनुसार)**

| वर्ष | दरडोई उत्पन्न |
|---|---|
| 1990-91 | 15996 (2004-05 सेरीज) |
| 1991-92 | 15748 |
| 1992-93 | 16308 |
| 1993-94 | 16736 |
| 1994-95 | 17505 |
| 1995-96 | 18487 |
| 1996-97 | 19548 |
| **वर्ष** | **दरडोई उत्पन्न** |
| 1997-98 | 19927 |
| 1998-99 | 20734 |
| 1999-2000 | 22178 |
| 2000-01 | 22491 |
| 2001-02 | 23095 |
| 2002-03 | 23607 |
| 2003-04 | 25116 |
| 2004-05 | 26629 |
| 2005-06 | 28639 |
| 2006-07 | 30805 |
| 2007-08 | 33446 |
| 2008-09 | 33987 |
| 2009-10 | 36249 |
| 2010-11 | 39270 |
| 2011-12 | 41455 |
| 2011-12 | 63462 (2011-12 सेरीज) |
| 2012-13 | 65538 |
| 2013-14 | 68572 |
| 2014-15 | 72862 |
| 2015-16 | 77803 |
| 2016-17 | 82269 |
| 2017-18 | 86660 |

संदर्भ : आर्थिक सर्व्हेक्षण, 2017-18

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सन 1990-91 मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न केवळ 15996 रूपये होते. त्यात वाढ होवून ते 2017-18 मध्ये 86660 (स्थिर किंमतीनुसार) वर आले.

**3) जागतिकीकरणामुळे भारतात नवे तंत्रज्ञान व बहुराष्ट्रीय कंपन्या येत आहेत.** आजमितीस जगात साधारणपणे 50,000 बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्यांच्या तीन लाखापर्यंत शाखा आहेत. 1991 नंतर सरकारने परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान यावरील नियंत्रणे रद्द केली. त्यामुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या गुंतवणूक करू लागल्या. या कंपन्याकडे भांडवल, तंत्रज्ञान उपलब्ध असते. बहुराष्ट्रीय कंपन्या दोन किंवा अधिक देशांमध्ये कार्यरत असतात. त्यांचे मुख्यालय सहसा त्यांच्या मायदेशी किंवा एखाद्याच देशात असते, तर त्यांच्या शाखा किंवा संलग्न संस्था इतर देशांमध्ये असतात. बहुराष्ट्रीय कंपन्यासाठी भारत ही खूप मोठी बाजारपेठ आहे. परकीय गुंतवणूकीसाठी भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी संधी आहे. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना परकीय कंपन्याबरोबर सहयोगी होण्यास परवानगी दिली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे तंत्रज्ञान भांडवल भारतात आल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर वाढेल. भारतीय कंपन्यांना देखील परकीय कंपन्याबरोबर सहयोग करायला परवानगी दिली आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली आहे.

**4) जागतिकीकरणानंतर भारताच्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीत वाढ होत आहे.** सरकारने 1991 मध्ये परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान यावरील नियंत्रणे रद्द केली. भारतातील औद्योगिक कंपन्यांच्या समभागात 51 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त भांडवलाची गुंतवणूक करण्यास परकीय उद्योगाला परवानगी देण्यात आली. ज्या उद्योगात नव्या तंत्रज्ञानाची गरज असून ही भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण जास्त आहे. अशा निवडक अग्रक्रम औद्योगिक क्षेत्रात परदेशी गुंतवणूकदारांना 51 टक्के पर्यंत भागभांडवलात सहभागी होता येईल अशा उद्योगात सेवा क्षेत्रातील उद्योगाचाही समावेश केला. वाहतूक, अन्नप्रक्रिया, उद्योग, हॉटेल्स, पर्यटन, खते इ. खालील तालीकेत जागतिकीकरणानंतर भारतातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह आकडेवारीत दिला आहे.

**तक्ता क्रमांक-3**

**भारतातील परकीय गुंतवणूक**

| वर्ष | आवक | जावक |
|---|---|---|
| 1995 | 2152 | 119 |
| 1996 | 2525 | 240 |
| 1997 | 3619 | 113 |
| 1998 | 2633 | 47 |
| 1999 | 2168 | 80 |
| 2000 | 3585 | 509 |
| 2001 | 5472 | 1397 |
| 2002 | 5627 | 1669 |
| 2003 | 4323 | 1879 |
| 2004 | 5771 | 2179 |
| 2005 | 7606 | 2978 |
| 2006 | 19622 | 12848 |
| 2007 | 22950 | 13649 |
| 2008 | 27650 | 14642 |
| | **102606** | **51750** |

वरील तालीकेवरून हे स्पष्ट होते की, जागतिकीकरणानंतर भारतात होणाऱ्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीत वाढ झालेली आहे. तसेच भारतातून इतर देशात होणाऱ्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीत वाढ झालेली आहे.

**शोधनिबंधाचे निष्कर्ष :-**

जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम या शोधनिबंधाचे पुढील निष्कर्ष आहेत.

1) जागतिकीकरणामुळे भारताच्या परकीय गंगाजळीत वाढ होत आहे.

2) जागतिकीकरणामुळे भारताला नवीन तंत्रज्ञान प्राप्त होत आहे.

3) जागतिकीकरणामुळे भारताच्या आर्थिक वृध्दीच्या दरात वाढ होत आहे.

# जागतिकीकरणापूर्वीचे व जागतिकीकरणानंतरचे भारतीय अर्थव्यवस्थेचे विविध विकास दर

**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,
उस्मानाबाद
**डॉ. तुकाराम लिंबाजी बारबोले**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर

**प्रस्तावना :-**

सर्वसाधारपणे १९९० च्या सुमारास भारतीय अर्थव्यवस्था अभूतपूर्व आर्थिक पेचप्रसांगतुन जात होती. भारताचा आर्थिक अभिवृद्धीचा दर लक्षणीय प्रमाणात खालावलेला होता. सन १९९१-१९९२ या काळात भारताचा अभिवृद्धीदर १.५ इतकाच हाता. उलट परिस्थिती भाववाढीच्या दराची होती भाववाढीचा दर १६.७% होता. परकीय गंगाजळीचा साठा दोन आठवडे व्यापाराला पुरेल इतका म्हणजे केवळ १ अब्ज डॉलर्स इतका होता. संपूर्ण अर्थव्यवस्था कुंठीत सापडलेली होती. तत्कालीन कालखंडात अर्थव्यवस्थेला संकटातून वाचवण्यासाठी २४ जूलै १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्री पी.व्ही.नरसिंहराव सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले या नवीन आर्थिक धोरणात खाजगीकरण, उदारीकरण (शिथलीकरण) व जागीतकीकरणाचा समावेश होतो.

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोंडीची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया ह्या संज्ञेचा उपयोग बहुध आर्थिक जागितकीकरणाच्या संदर्भात केला जातो. यात व्यापार, विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थांसाठी खुले केले जाते. सन १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरुवात झाली ह्या काळात देशावरचे विदेशी कर्ज एवढे वाढले होते की जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्या संघटनांनी भारताला आणखो कर्ज देणे नाकारले व कर्ज मिळवण्यासाठी भारतावर काही अटी लादल्या. ह्या अटीत आर्थिक सुधारणा स्वीकारल्या जात जागतिकोकरणासोबत उदारीकरण व खाजगीकरण हयांचा पण समावेश होतो. याना एकत्रित रित्या खा.ऊ.जा.धोरण म्हणतात.

**गृहीतके :-** अभ्यास विषमाला अनुसरून काही गृहितके निश्चित केलेली आहेत.

१) जागतीकोकरणानंतर स्थुल देशी उत्पनाच्या दरात वाढ होत आहे.
२) जागतीकोकरणानंतर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नाचा दर वाढत आहे.
३) जागतीकरणानंतर निव्वळ दरडोई उत्पन्नाचा दर वाढत आहे.

**संशोधन पद्धती व संशोधन साधने :-**

विश्लेषनात्मक संशोधन पद्धती वापरलेली आहे. व द्वितीयक साधन साम्रगीचा वापर केला आहे. संदर्भ ग्रंथ, पुस्तके भारत सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण २०१७-१८ वापर लिखाणासाठी केला आहे.

**तक्ता क्रमांक १**

**भारतीय अर्थव्यवस्थेचा स्थुल देशी उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न व निव्वळ दरडोई उत्पन्न वृध्दीचा दर**

**(स्थित किंमतीनुसार २००४-०५)**

| वर्ष | स्थुल देशीउत्पन्न दर | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न दर | निव्वळ दरडोई उत्पन्न दर |
|---|---|---|---|
| १९७८-७९ | ५.७ | ५.९ | ३.६ |
| ७९-८० | -५.१ | -५.९ | -८.२ |
| ८०-८१ | ६.८ | ६.९ | ४.५ |
| ८१-८२ | ५.९ | ५.९ | ३.९ |
| ८२-८३ | ३.२ | ३.० | ०.६ |
| ८३-८४ | ७.३ | ७.५ | ५.३ |
| ८४-८५ | ३.७ | ३.४ | १.१ |
| ८५-८६ | ५.३ | ५.२ | २.९ |
| ८६-८७ | ४.७ | ४.६ | २.४ |
| ८७-८८ | ३.८ | ३.५ | १.२ |
| ८८-८९ | ९.४ | ९.८ | ७.५ |
| ८९-९० | ५.९ | ५.९ | ३.७ |
| **सरासरी** | **४.४०** | **४.६४** | **२.३७** |

**आधार : आर्थिक सर्वेक्षण २०१७-१८**

वरील तालीकेत नवीन आर्थिक धोरणापूर्वी (२०००४-०५) सीरीज नुसार आकडे दिलेले आहे. सन १९७८-७९ ते १९८९-९० या काळात स्थुल देशी उत्पन्न वाढीचा दर ४.४० होता. तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर या काळातील ४.६४ होता. [illegible] दरडोई निव्वळ उत्पन्न वाढीचा दर २.३७ होता.

### तक्ता क्रमांक २
### भारतीय अर्थव्यवस्थेचा स्थुल देशी उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न व निव्वळ दरडोई उत्पन्न वृध्दीचा दर
### (स्थित किंमतीनुसार २००४-०५)

| वर्ष | स्थुल देशीउत्पन्न दर | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न दर | निव्वळ दरडोई उत्पन्न दर |
|---|---|---|---|
| १९९०-९१ | ५.३ | ५.२ | ३.१ |
| १९९१-९२ | १.० | ०.४ | १.५ |
| १९९२-९३ | ५.५ | ५.५ | ३.६ |
| १९९३-९४ | ४.९ | ५.०० | २.६ |
| १९९४-९५ | ६.७ | ६.७ | ४.६ |
| १९९५-९६ | ७.६ | ७.७ | ५.६ |
| १९९६-९७ | ७.७ | ७.८ | ५.७ |
| १९९७-९८ | ४.२ | ३.९ | १.९ |
| १९९८-९९ | ६.२ | ६.१ | ४.१ |
| १९९९-०० | ८.८ | ८.९ | ७.० |
| **सरासरी** | **५.७९** | **४.७९** | **३.६७** |

आधार : आर्थिक सर्वेक्षण २०१७-१८

वरील तालीकेत नवीन आर्थिक धोरणानंतर (२००४-०५) च्या सीरीज नुसार आकडे दिलेले आहे. सन १९९०-९१ ते १९९-०० या काळात स्थुल देशी उत्पन्न वाढीचा वृद्धीदर ५.७९ होता. तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ४.७६ होता. व निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर ३.६७ होता. म्हणजे १९८०-९० च्या दशकापेक्षा १९९०-९१ च्या १९०-०० या दशकात स्थुल देशी उत्पन्न दर, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर व निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीच्या दरात वाढत झालेली आहे.

### तक्ता क्रमांक ३
### भारतीय अर्थव्यवस्थेचा स्थुल देशी उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न व निव्वळ दरडोई उत्पन्न वृध्दीचा दर
### (स्थित किंमतीनुसार २००४-०५)

| वर्ष | स्थुल देशीउत्पन्न दर | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न दर | निव्वळ दरडोई उत्पन्न दर |
|---|---|---|---|
| २०००-०१ | ३.६ | ३.२ | १.४ |
| २००१-०२ | ५.० | ४.८ | २.७ |
| २००२-०३ | ३.९ | ३.८ | २.२ |
| २००३-०४ | ७.९ | ८.० | ६.४ |
| २००४-०५ | ७.९ | ७.७ | ६.० |
| २००५-०६ | ९.३ | ९.२ | ७.५ |
| २००६-०७ | ९.२ | ९.१ | ७.६ |
| २००७-०८ | १०.२ | १०.१ | ८.६ |
| २००८-०९ | ३.७ | ३.० | १.६ |
| २००९-१० | ८.५ | ८.१ | ६.७ |
| २०१०-११ | ९.८ | ९.८ | ८.३ |
| २०११-१२ | ६.९ | ६.५ | ५.१ |
| **सरासरी** | **७.१५** | **६.९४** | **५.३४** |

आधार : आर्थिक सर्वेक्षण २०१७-१८

वरील तक्ता क्रंमाक ३ मध्ये सन २००१ ते २०११-१२ पर्यंत स्थुल देशी उत्पन्न दर, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचादर व निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर दर्शविलेला आहे. या काळातील स्थुल देशी उत्पन्न दर ७.१५ एवढा तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.९४ व निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर ५.३४ होता. वरील तालीके वरुन स्पष्ट होते की १९८०-९० च्या दशकापेक्षा १९९०-९१ ते १९९९-२००० या दशकात व १९९९-०० या दशकापेक्षा २०००-०१ ते २०११-१२ या कालावधीत स्थुल देशी उत्पन्न दर, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर व निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर वाढलेला आहे.

**तक्ता क्रमांक ४**

**भारतीय अर्थव्यवस्थेचा स्थुल देशी उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न व निव्वळ दरडोई उत्पन्न वृध्दीचा दर**

**(स्थित किंमतीनुसार २०११-१२)**

| | स्थुल देशीउत्पन्न दर | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न दर | निव्वळ दरडोई उत्पन्न दर |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ५.१ | ४.५ | ३.३ |
| २०१३-१४ | ६.३ | ६.० | ४.६ |
| २०१४-१५ | ७.६ | ७.६ | ६.३ |
| २०१५-१६ | ८.० | ८.१ | ६.८ |
| २०१६-१७ | ७.० | ७.१ | ५.७ |
| २०१७-१८ | ६.६ | ६.७ | ५.३ |
| **सरासरी** | **६.७६** | **६.६६** | **५.३३** |

आधार : आर्थिक सर्वेक्षण २०१७-१८

वरील तक्ता क्रमाक ४ मध्ये सन २०११-१२ च्या सीरीजनुसार स्थुल देशी उत्पन्न दर, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचादर व निव्वळदरडोई उत्पन्न वाढीचा दर दर्शविलेला आहे. सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीतील स्थुल देशी उत्पन्नदर ६.७६ तर सरासरी निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.६६ व सरासरी निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर ५.३३ होता.

**तक्ता क्रमांक ५**

**भारतीय अर्थव्यवस्थेचा स्थुल देशी उत्पन्न निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न व निव्वळ दरडोई उत्पन्न वृध्दीचा दर**

| कालखंड | स्थुल देशीउत्पन्न वाढीचादर | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचादर | निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचादर |
|---|---|---|---|
| १९७८-७९ ते १९८९-९० (२००४-०५ सीरीजनुसार) | ४.४० | ४.६४ | २.३७ |
| १९९०-९१ ते १९९९-०० (२००४-०५ सीरीजनुसार) | ५.७९ | ४.७६ | ३.६७ |
| २०००-०१ ते २०११-१२ (२००४-०५ च्या सीरीजनुसार) | ७.१५ | ६.९४ | ५.३४ |
| २०१२-१३ ते २०१७-१८ (२०११-१२ च्या सीरीजनुसार) | ६.७६ | ६.६६ | ५.३३ |

आधार : आर्थिक सर्वेक्षण २०१७-१८

वरील तालीकेवरुन हे स्पष्ट होते की जागीतकीकरणानंतर स्थुल देशी उत्पन्न वाढीचादर, निव्वळ उत्पन्न वाढीचा दर व निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दरात वाढ झालेली आहे.

**शोध निबंधाचे नित्कर्शी :-**

प्रस्तुत शोधनिबंधाचे निष्कर्श पुढील प्रमाणे आहेत.

१) जागतीकीकरणानंतर स्थुल देशी उत्पन्नाच्या दरात वाढ झालेली आहे. सयन १९७८-७९ ते १९८९-९० या काळात स्थुल देशी उत्पन्न वाढीचा दर ४.४० तर १९९०-९१ ते १९९९-०० या काळात तो ५.७९ व २०००-०१ ते २०११-१२ या काळात तो ७.१५ वर पोहोचला व २०१३-१३ ते २०१७-१८ या काळात तो ६.७६ आला. म्हणजे स्थुल देशी उत्पन्नाचा दरात वाढ झालेली आहे.

२) जागतीकीकरणानंतर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या दरात वाढ झालेली आहे. सन १९७८-७९ ते १९८९-९० या काळात निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ४.६४ तर १९९०-९१ ते १९९९-०० या काळात तो ४.७६ व २०००-०१ ते २०११-१२ या काळात ६.९४ वर पोहोचला व २०१२-१३ ते २०१७-१८ या काळात तो ६.६६ वर पोहोचला जागतीकीकरणानंतर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर वाढला आहे.

३) जागतीकीकरणानंतर निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर वाढला आहे. सन १९७८-७९ ते १९८९-९० या काळात निव्वळ दरडोई उत्पन्न वाढीचा दर २.३७ तर १९९०-९१ ते १९९९-०० या काळात तो ३.६७ २००१ ते २०११-१२ या काळात ५.३४ व २०१२-१३ ते २०१२-१८ या काळात ५.३३ वर हा दर पोहोचला आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) Economics survey 2017-18 volome-1 & 2 (Central Government)
2) Indian Economy- Dutta & Sundaram.
३) ''जागतिकीकरणाचे राजकीय अर्थशास्त्र'', श्री. भालचंद्र मुणगेकर यांचे मराठी अर्थशास्त्र परिषदेतील अध्यक्षीय भाषण